पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University,Solapur
केगाव सोलापूर
ईपीएबीएक्स ०२१७ -२७४४७७८ (११ लाईन्स) विस्तृत क्र २२५ फॅक्स-०२१७-२७४४७७०
: http://su.digitaluniversity.ac, www.sus.ac.in Email; dsw@sus.ac.in
विद्यार्थी विकास विभाग/Department of Student Development


जावक्र पुआहोसोविसो/विद्यार्थी विकास/२०२४-२५/ 6527 दि. 2 SEP 2024

प्रति,

मा. प्राचार्य,
सर्व संलग्न महाविद्यालये,
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर
सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

**विषय:- युवा महोत्सवातील कव्वाली या कलाप्रकाराच्या नियमावलीबाबत**

**संदर्भ:- या विभागाचे पत्र क्र पुआहोसोविसो/विद्यार्थी विकास/२०२४-२५ /६४६०/दि.३०/०८/२०२४**

महोदय,

प्रस्तूत विद्यापीठाचा २० वा युवा महोत्सव दि.०१ ते ०४ आक्टोबर २०२४ दरम्यान लोकमंगल उद्योजकता महाविद्यालय, वडाळा येथे संपन्न होत आहे तसेच युवा महोत्सवातील विविध कलाप्रकार सादरीकरणाच्या अनुषंगाने तयार करण्यात आलेली नियमावलीबाबत आपणास उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये कळविण्यात आले होते. सदर नियमावली मध्ये नजरचुकीने कव्वाली या कलाप्रकाराच्या नियमावलीचा समावेश करावयाचा राहीला होता. तरी युवा महोत्सवातील कव्वाली या कलाप्रकारासाठी खालीलप्रमाणे नियमवलीचा वापर करावा.

कव्वाली

१. प्रत्येक महाविद्यालयाचा किमान ६ आणि जास्तीत जास्त १० विद्यार्थी सहभागी (पुरूष किंवा महिला किंवा दोन्ही) असलेला एकच संघ सहभागी होवू शकेल.
२. संघ दोन कव्वाली गाणी सादर करेल, यापैकी एक राष्ट्रीय एकात्मता या थिमवर आधारीत असेल आणि दुसरे सामाजिक सद्भावना या थिमवर आधारित असेल,
३. यात चित्रपट गीत व गाण्यांना परवानगी असेल.
४. दोन्ही कव्वाली गाण्यांसह सादरीकरणाचा एकूण कालावधी किमान १२ आणि कमाल १५ मिनिटे असेल. आयोजकाच्या अंतिम घोषनेनंतर वेळेची गणना लगेच सुरू होईल.
५. स्टेज/इन्स्ट्रुमेंट सेटिंगसाठी वेळ जास्तीत जास्त १० मिनिटे दिला जाईल.
६. साथीदारांची कमाल संख्या ३ असावी. तथापि, विद्यार्थी सहभागी गाताना वाद्ये वाजवू शकतात. विद्यार्थी सहभागी / सहभागी साथिदार दरम्यान सिंथेसायझर किंवा इतर कोणतेही इलेक्ट्रॉनिक उपकरण गॅझेट वापरू शकतात. परंतु ते फक्त एकाच मोडमध्ये वापरले जातील.

तरी उपरोक्त नियमानुसार कवाली या कलाप्रकाराचे सादरीकरण करण्यात यावे तसेच दि.३०/०८/२०२४ रोजी पाठविण्यात आलेल्या पत्रात नमुद केलेल्या सूचनांचे तंतोतंत पालन करण्याबाबत योग्य त्या सूचना आपल्याकडून संघव्यवस्थापक तसेच विद्यार्थ्यांना द्याव्यात व आपल्या विद्यापीठाचा २० वा युवा महोत्सव २०२४-२५ यशस्वीपणे पार पाडण्यास सहकार्य करावे.

कळावे.

आपला स्नेहांकीत

प्र संचालक,
विद्यार्थी विकास विभाग